# पांजरी येथे शेतीशाळेचे आयोजन



◆ नागपूर, १ डिसेंबर

आयसीएआर-सीआयसीआरतर्फे पंजरी येथील सीआयसीआर सभागृहात शेतीशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सीआयसीआरचे संचालक डॉ. व्ही. एन. वाघमारे होते. मुख्य नोडल अधिकारी डॉ. अर्जुन तायडे, वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जी. आय. रामकृष्ण, डॉ. बाबासाहेब फंद, सीआयआरसीओटीचे डॉ. डी. यू. पाटील आणि सीआयटीआय-सीडीआरएचे प्रकल्प समन्वयक गोविंद वैराळे उपस्थित होते. प्रास्ताविकात गोविंद वैराळे यांनी कापूस उत्पादनातील जागतिक तफावत व एचडीपीएस या उच्च घनता लागवड तंत्रज्ञानाचे महत्त्व स्पष्ट केले. डॉ. तायडे यांनी प्रात्यक्षिकांची गरज व शेतकऱ्यांना होणारे फायदे सांगितले.

मान्यवरांच्या हस्ते शंभर कापूस वेचणी पिशव्या शेतकऱ्यांना वितरित करण्यात आल्या. तांत्रिक सत्रांमध्ये पेरणीचा वेळ, पाणी व पोषक व्यवस्थापन, तणनियंत्रण, कीटक, रोग प्रतिबंध, शिफारस केलेल्या बियाणे, वाणांचा वापर याबाबत तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. दुपारी एचडीपीएस लागवडीचे क्षेत्रीय प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. शेतकऱ्यांनी पीकवाढ व तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष परिणाम पाहिला. या कार्यक्रमाला नागपूर आणि वर्धा जिल्ह्यांतील ११८ हून अधिक शेतकऱ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. ◀*(तभा वृत्तसेवा)*

**Tarun Bharat, 02 December, 2025**